24 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता आवश्यक

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

सध्या युवकाला शिक्षणाच्या संधी मिळत आहेत, पण दर्जा सुधारण्याबाबत अजूनही प्रयत्न होण्याची गरज आहे. युवकांनी केवळ पदवी घेवून समाधान न मानता सकारात्मकता आवश्यक असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले. कोल्हापूर वुई केअर कॅम्पेशन २४ युथ अनेक्स आणि जुगाड काउन्सिलिंग सेंटरच्यावतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. शाहू स्मारक भवन येथे व्याख्यान झाले.

**बीसीयूडी डॉ. डी.आर. मोरे यांचे मत**

'व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे काय' विषयावर बोलताना डॉ. मोरे म्हणाले, 'गेल्या ७० वर्षांच्या काळात देशातील शैक्षणिक व्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल झाला. व्यक्तिमत्त्व विकास आणि रोल मॉडेलचा संबंध नाही. पण अशा रोल मॉडेलपासून ऊर्जा मिळते असा मर्यादित अर्थ व्यक्तिमत्त्व विकासाचा काढता येईल. शिक्षणानंतर खऱ्या अर्थाने करिअरला सुरुवात होते, त्यामुळे युवकांनी शिक्षण आणि करिअर यामधील फरक समजावून घेण्याची आवश्यकता आहे.'

गृह पोलिस उपधीक्षक सतीश माने म्हणाले, 'व्यक्तिमत्त्व विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. देशाची प्रतीमा व्यक्तिमत्त्व विकासावरच अवलंबून आहे. उत्तम आणि चारित्र्यवान चालणारी प्रक्रिया आहे. देशाची प्रतिमा व्यक्तिमत्त्व विकासावरच अवलंबून आहे. उत्तम व चारित्र्यवान नागरिक बनण्याचे ध्येय तरुणांनी ठेवल्यास व्यक्तिमत्त्व विकासासाठी विधायक पाऊल पडेल.'

यावेळी प्रसन्न रबडे, शुभांगी खासनीस यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास वुई केअरचे अध्यक्ष मिलिंद धोंड, मिसेस महाराष्ट्र गौरी शिरोडकर, तेजस्विनी गायकवाड, रौनक शहा, सुशील गांधी, पूजा पवार, सुजित काशीद, मंजिरी कापडेकर, स्नेहा कब्बूर, कविता घाटगे यांच्यासह यून अॅनेक्स प्रतिनिधी व विद्यार्थी उपस्थित होते.




**वुई केअरच्यावतीने आयोजित व्याख्यानाचे उद्घाटन करताना बीसीयूडी डॉ. डी. आर. मोर. शेजारी सुशील गांधी, रौनक शहा, सतीश माने, मिलिंद धोंड, गौरी शिरोडकर, तेजस्विनी गायकवाड.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2017
लोकमत




कोल्हापूर वुई केअर-कॅम्पेशन २४ युथ अनेक्स, जुगाड कौन्सिलिंग सेंटरच्या व्याख्यानात डॉ. डी. आर. मोरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गृहपोलिस उपअधीक्षक सतीश माने, मिलिंद धोंड, गौरी शिरोडकर, आदी उपस्थित होते.

# तरुणांनी सकारात्मक व्हावे : डी. आर. मोरे

**कोल्हापूर** : आजच्या तरुणाईला शिक्षणाच्या खूप संधी आहेत, मात्र त्यांनी केवळ पदवी घेऊन न बसता शेवटच्या क्षणापर्यंत सकारात्मक राहण्याची गरज आहे, असे मत 'बीसीयुडी'चे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केले.

कोल्हापूर वुई केअर-कॅम्पेशन २४ युथ अनेक्स आणि जुगाड कौन्सिलिंग सेंटरच्यावतीने आयोजन केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी गृहपोलिस उपअधीक्षक सतीश माने, संस्थेचे अध्यक्ष मिलिंद धोंड, 'मिसेस महाराष्ट्र' गौरी शिरोडकर, युथ अनेक्सच्या अध्यक्ष तेजस्विनी गायकवाड, रौनक शहा, सुशील गांधी उपस्थित होते.

डॉ. मोरे यांनी बदलत गेलेल्या शिक्षणव्यवस्थेचा आढावा घेतला. गृहपोलिस उपअधीक्षक माने यांनी तरुणांनी उत्तम आणि चारित्र्यवान नागरिक बनण्याचे ध्येय ठेवावे, असे मत व्यक्त केले. प्रसन्न रबडे यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर मार्गदर्शन केले. शुभांगी खासनीस यांनी युवकांनी शिक्षण आणि करिअरमधील फरक समजून घेतला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

यावेळी पूजा पवार, सुजित काशीद, मंजिरी कपडेकर, स्नेहा कब्बूर, कविता घाटगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

24 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# त्या प्राध्यापकाची चौकशी करा

## कुलगुरूंना बळीराजा शेतकरी संघटनेचे निवेदन



कोल्हापूर : कुलगुरूंना निवेदन देताना नितिन पाटील व कार्यकर्ते.

प्रतिनिधी
चंदगड

चंदगड येथील र. भा. माडखोलकर महाविद्यालयातील प्रा. गुंडू कांबळे यांने विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याप्रकरणी त्याच्यावर चंदगड पोलिसांत गुन्हा नोंद झाला असून त्याला सेवेतून तत्काळ निलंबित करावे, अशी मागणी बळीराजा शेतकरी संघटनेचे नितिन पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे केली आहे.

विकृत प्रवृत्तीचा प्रा. गुंडू कांबळे गेली पंधरा वर्षे अशा प्रकारे विद्यार्थीनीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची लैंगिक अत्याचारण करीत आहे. या प्रकरणात शिवाजी विद्यापीठाने लैंगिक छळ प्रतिबंधक समितीमार्फत चंदगड महाविद्यालयातील या प्रकाराची चौकशी करावी. राज्य महिला आयोगाच्या निदर्शनास सदर प्रकरण आणून देऊन प्रा. गुंडू कांबळे याला कठोर शिक्षा व्हावी. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर विद्यापीठाला भेट देणार आहेत. त्यावेळी बळीराजा शेतकरी संघटनेची भेट घडवून द्यावी व तातडीने या प्रकरणाची चौकशी होऊन कारवाई करावी, अशी मागणी नितिन पाटील, ॲड. मारूती रेडेकर, नरेंद्र पाटील यांनी केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

## नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे व कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी वित्त व लेखाधिकारी ए. बी. चौगुले, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. पद्मजा पाटील, डॉ. एन. डी. पारकेर, डॉ. अविनाश पाटील यांच्यासह इतिहास विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.